Std. : 4th Subject: Marathi

Prepared by: Pallavi Surve LESSON- पाठ १४.अजिंठा सहल (प्रवास वर्णन)

**पूर्व उपक्रम** - तुम्ही भेट दिलेल्या कोणत्याही एका प्रेक्षणीय स्थळाबद्दल पाच ते सहा ओळीत माहिती लिहा.

**शब्दार्थ**

१.लेणी=डोंगरामध्ये कोरलेली शिल्पे

२. गवाक्षे =हवा व उजेड आत येण्यासाठी ठेवलेल्या खिडक्या

३. करुणा =दया

४.शिणवटा= थकवा

५.दालन =मोठी खोली

६.मुख= चेहरा

७.स्तंभ= खांब

८. पद्मासन =बैठक बसण्याची एक स्थिती

९. मस्तक =डोके

१०.तथागत =तथ्य( योग्य ते) घेऊन आलेले, श्रेष्ठ

११. मुद्रा =भाव

**वाक्यप्रचार**

१. नवल वाटणे = आश्चर्य वाटणे

२.जतन करणे = जपणूक करणे

**अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) मुलांना कोणती लेणी पहावयास नेले?

उत्तर-मुलांना अजिंठ्याची लेणी पहावयास नेले.

२) चौथऱ्यावर कोणाची मूर्ती आहे?

उत्तर चौथऱ्यावर गौतम बुद्धांची मूर्ती आहे.

३) वेरूळची लेणी किती वर्ष जुनी आहे?

उत्तर वेरूळची लेणी सुमारे दोन हजार वर्षे जुनी आहे.

४) ही लेणी कोरण्यास किती वर्षे लागली?

उत्तर ही लेणी कोरण्यास सुमारे आठशे वर्षे लागली.

**आ) काय ते सांगा.**

१) अर्धचंद्रासारखी दिसणारी लेणी - अजिंठा लेणी

२) गुफांची एकूण संख्या - तीस

३) मुखावर करूण भाव असलेली मूर्ती - गौतम बुद्धांची मूर्ती

४) एकोणिसाव्या  लेणीचे नाव - गंधकुटी

५) बुद्धांच्या कथा - जातक कथा

**इ) पुढील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१. नवल वाटणे-आश्चर्य वाटणे

मुंबईमधील उंचच उंच इमारती पाहून खेडेगावातील रामूला नवल वाटले.

२. जतन करणे - जपवणूक करणे

आजी-आजोबांनी दिलेल्या संस्कारक्षम गोष्टी जतन करून ठेवल्या पाहिजेत.

**इ)पाठात 'नक्षीदार'शब्द आला आहे त्याप्रमाणे पुढील शब्दांना 'दार'जोडून नवीन शब्द बनवा.**

१. ऐट =ऐटदार २. धार =धारदार

३. डौल =डौलदार ४. बाक= बाकदार.

S.TEACHER HOD COORDINATOR PRINCIPAL